# देशप्रेम

स्वप्नाच्या मनोराज्यात मनसोक्त बुड्या मारणारे, मनच ते मानवाचे
स्वप्नं तरी कशी, नाजूक नाजूक फुलापाखरंच जशी
कधी एक तर कधी अनेक, परवानगीशिवाय येतील
डोळे मिटलेले असोत की उघडे, तरी हळूवार स्पर्शून जातील

स्वप्नांमध्ये कितीतरी बांधली गेली मनोराज्ये
पण सगळीच काही होत नाहीत स्वराज्ये
अर्ध्यापेक्षा जास्ती कोसळली, तरी सुध्दा स्वप्नांची चालूच होती उसळी

एक होते असे स्वप्न भारी, "आपणही दूर देशी जावे करायला प्रगती"
असली स्वप्नं होतात कां हो खरी?
असाच एक दिवस उगवला, एका स्वप्नाने विजयाचा झेंडा रोवला

पाय लागलेले दिसले दूरदेशी
मन मात्र मागे राहिले होते मायदेशी

काळानी जणू घेतला होता वसा, न थांबता धावत होता जसा ससा

हे सर्व स्वप्नच ना? की घडले खरे? हे स्वप्नचं असलेले बरे
देवा हे माझे स्वप्नं, स्वप्नंच राहो, न होवू दे खरे !

- **सौ. अरुंधती सरपटवारी** (बाल्टिमोर, मेरीलँड)